नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/01/2024 **(शनिवार)सकाळ**

## नागपूर ग्रामीण पोलीस दलाचा 'रेझिंग डे' उत्साहात साजरा

नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे 'रेझिंग डे' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस रेझिंग दिनानिमित्य विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविले. यामध्ये पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक ०६/०१/२०२४ रोजी श्री. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांच्या अध्यक्षतेखाली रेजिंग डे निमित्त ज्येष्ठ नागरिकांची बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये आपल्या प्रकृतीची काळजी घेऊन नियमित चालणे फिरणे सुरू ठेवावे काही अडचणी असल्यास पोलीसांना कळवाव्या सविस्तर चर्चा करण्यात आली. पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत इंडियन पब्लिक स्कूल अरोली येथील विद्यार्थ्यांना बोलावून पोलीस स्टेशनचे कामकाज कसे चालतात व त्यांना शस्त्राविषयी, सायबर गुन्हे व वाहतूक नियम इ. माहिती देऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत शालेय विद्यार्थिनींची ३ km रनिंग स्पर्धा घेऊन त्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच पोलीस स्टेशन मध्ये कशा प्रकारे कामकाज चालते या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत सेंट पॉल स्कूल बुट्टीबोरी येथील विद्यार्थी/विद्यार्थीनिंना सायबर जागरूकता, डायल ११२ प्रणाली, वाहतुकीचे नियम, मुलींना पोस्को कायद्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच मौजा सातगाव येथे क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील मोजा खुर्सापार येथे महाराष्ट्र पोलीस RAISING DAY निमित्त मयूर क्रिकेट क्लब व वेलकम क्रिकेट क्लब यांच्यामध्ये क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथील ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी /विद्यार्थिनींना पोलिसाचे कामकाजविषयी माहिती देऊन महिलांविरुद्धचे गुन्हे, सायबर गुन्हे तसेच वाहतुकीचे नियमांबाबत माहिती देऊन पोलिसांची जनमानसातील प्रतिमा या विषयावर निबंध स्पर्धा घेऊन विजेत्या विद्यार्थांना पारितोषिक देण्यात आले. पो.स्टे. पारशिवनी येथे पोलीस रेझिंग दिनानिमित्य केसरीमल पालीवाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पारशिवनी येथील विद्यार्थी/विद्यार्थीनिंना पोलीस स्टेशनचे कामकाजाविषयी, वाहतूक नियम तसेच शस्त्राविषयी माहिती देण्यात आली आहे.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर